**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**दुसरा मजला, मंत्रालय, मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२**
**Email ID- pol4.home@maharashtra.gov.in**

---

**क्रमांक :एमटीएस-०३१९/प्र.क्र.२४५/पोल-४,** **दिनांक : १४ मार्च, २०२३**

प्रति,
व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय चर्नी रोड,
मुंबई.

**विषय :-** सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक,पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक, (सेवाप्रवेश) नियम, २०१९ शासन राजपत्रामध्ये प्रसिध्द करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयांकित प्रकरणी सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक,पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक, (सेवाप्रवेश) नियम,२०१९ मध्ये सुधारणा करण्यासंबंधी शासन अधिसूचनेची इंग्रजी व मराठी प्रत सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. सदर सुधारणा महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४ (ब) मध्ये आज दिनांक १४ मार्च, २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात यावी व त्याच्या प्रत्येकी मराठी व इंग्रजीच्या १०० प्रती शासनास व पोलीस महासंचालक कार्यालयास उपलब्ध करुन देण्यात याव्या, ही विनंती.

olc
१५/०३/२३

( कैलास गायकवाड )
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :- पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

RR_2023
मराठी व इंग्रजी अधिसूचना

**आदेश**

गृह विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक १४ मार्च, २०२३

महाराष्ट्र पोलीस अधिनियम.

**क्रमांक. एमटीएस-०३१९/प्र.क्र.२४५/पोल-४.** - महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याच्या कलम ५(ब) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक , पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक(सेवा प्रवेश ) नियम, २०१९ यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे:-

**१.** या नियमांस, महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस हवालदार चालक (सेवा प्रवेश) (सुधारणा) नियम, २०२३ असे म्हणावे.

**२.** महाराष्ट्र सहायक पोलीस निरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवा प्रवेश) नियम, २०१९ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य नियम" असा केला आहे) याच्या नियम ६ च्या पोट-नियम (१) च्या खंड (ड) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल:-

"(ड) शारीरिक पात्रता-

| अनुक्रमांक (१) | शारीरिक पात्रता (२) | महिला (३) | पुरूष (४) | तृतीय पंथी (५) |
|---|---|---|---|---|
| (१) | उंची | १५८ सें.मी. पेक्षा कमी नसावी. | १६५ सें.मी. पेक्षा कमी नसावी. | **(अ) स्वत:ची लिंग ओळख महिला/तृतीय पंथी अशी केलेल्या व्यक्तीसाठी.-** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | १५८ सें.मी. पेक्षा कमी नसावी. **(ब) स्वतःची लिंग ओळख पुरुष अशी केलेल्या व्यक्तीसाठी.-** १६५सें.मी. पेक्षा कमी नसावी. |
| (२) | छाती | आवश्यक नाही. | न फुगवता ७९ सें.मी. पेक्षा कमी नसावी व न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सें.मी. पेक्षा कमी नसावा. | **स्वतःची लिंग ओळख महिला / पुरुष / तृतीयपंथी अशी केलेल्या व्यक्तीसाठी.-** आवश्यक नाही. |

टीप. - तृतीयपंथी व्यक्तीस तिची पुरुष, महिला किंवा तृतीयपंथी अशी स्वतःची लिंग ओळख निश्चित करण्याचा अधिकार आहे.

**३.** मुख्य नियमाच्या नियम ७ ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येईल:-

**"७. शारीरिक चाचणी (५० गुण).-**

जे उमेदवार शारीरिक व शैक्षणिक अहर्ता पूर्ण करतात अशा उमेदवारांनी शारीरिक पात्रता चाचणीसाठी उपस्थित राहणे आवश्यक असेल. शारीरिक पात्रता चाचणी पुढील प्रमाणे एकूण ५० गुणांची असेल:-

**(अ) पुरुष / तृतीयपंथी - स्वतःची लिंग ओळख पुरुष असे केलेले उमेदवार.**

| | गुण |
|---|---|
| (क) १६०० मीटर धावणे | ३० |
| (ख) गोळा फेक | २० |
| **एकूण** | **५०** |

**(ब) महिला / तृतीयपंथी - स्वतःची लिंग ओळख महिला / तृतीयपंथी अशी केलेले उमेदवार.**

| | गुण |
|---|---|
| (क) ८०० मीटर धावणे | ३० |
| (ख) गोळा फेक | २० |
| **एकूण** | **५०** |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

कैलास गायकवाड,
शासनाचे सहसचिव.

# ORDER

Home Department, Mantralaya,
Madam Cama Marg,
Hutatma Rajguru Chowk,
Mumbai-400 032,
Dated the 14th March, 2023.

Maharashtra Police Act.

No. MTS-0319/CR-245/Pol-4. - In exercise of the powers conferred by Clause *(b)* of Section 5 of the Maharashtra Police Act (XXII of 1951), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Assistant Police Sub-Inspector Driver, Police Head Constable Driver, Police Naik Driver and Police Constable Driver (Recruitment) Rules, 2019, namely :-

1. These rules may be called the Maharashtra Assistant Police Sub-Inspector Driver, Police Head Constable Driver, Police Naik Driver and Police Constable Driver (Recruitment) (Amendment) Rules, 2023.

2. For rule 6 of the Maharashtra Assistant Police Sub-Inspector Driver, Police Head Constable Driver, Police Naik Driver and Police Constable Driver (Recruitment) Rules, 2019, (hereinafter referred to as "the principal Rules") in sub-rule (1), for clause (*D*), the following clause shall be substituted, namely :-

" (*D*) Physical Qualifications. –

| Sr.No (1) | Measurement (2) | Female (3) | Male (4) | Transgender (5) |
|---|---|---|---|---|
| *(i)* | Height | Shall not be less than 158 centimeters. | Shall not be less than 165 centimeters. | ***(a) For self-identified gender identity as Female/ Third gender.*** - Shall not be less than 158 centimeters.<br>***(b) For self-identified gender identity as Male.*** - |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | Shall not be less than 165 centimeters. |
| *(ii)* | Chest | Not required. | Shall not be less than 79 centimeters deflated and the difference between deflated chest and expanded chest shall not be less than 5 centimeters. | ***For self-identified gender identity as Male / Female / Third gender.*** – Not required. |

*Note* :- Transgender person has right to decide their self-identified gender as male, female or as third gender.

3. For rule 7 of the Principal Rules, the following rule shall be substituted, namely :-

**"7. Physical Test (50 marks).-**

The candidates who fulfill the physical and educational qualifications shall be required to appear for physical fitness test. The physical fitness test shall be of 50 marks as follows, namely :-

**(A) Male / Transgender- Self-identified gender identity as Male Candidates.**

| | | **Marks** |
|---|---|---|
| (a) | 1600 Meters running | 30 |
| (b) | Shot put | 20 |
| | **Total** | **50** |

**(B) Female / Transgender- Self-identified gender identity as Female or Third Gender Candidates.**

| | | **Marks** |
|---|---|---|
| (a) | 800 Meters running | 30 |
| (b) | Shot put | 20 |
| | **Total** | **50** |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

Kailas Gaikwad,
Joint Secretary to Government.